सकाळ

# कैद्यांना मिळणार फास्ट फूड बनवण्याचे प्रशिक्षण

## कारागृह अधीक्षकांचा उपक्रम; स्वत:चा रोजगार सुरू करण्यासाठी मदत

**सातारा, ता. २५ :** कारागृहातून सुटल्यावर बंद्यांना (कैदी) स्वत:च्या पायावर उभे राहात समाजात मानाने फिरता यावे, यासाठी कारागृहाच्या सुधारणा पुनर्वसन या ब्रीद वाक्यानुसार कारागृह अधीक्षक शामकांत शेडगे यांनी फास्ट फूड प्रशिक्षण देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यातून बंद्यांना पुढे जाऊन स्वत:चा रोजगार सुरू करण्यासाठी मदत होणार आहे.



**सातारा :** जिल्हा कारागृहातील बंद्यांना फास्ट फूड प्रशिक्षण देण्याच्या कोर्सला सोमवारी सुरुवात झाली.

महाराष्ट्र कारागृह पोलिस विभागाचे अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा डॉ. सुहास वारके, विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर व कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनानुसार सातारा जिल्हा कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे हे बंद्यांसाठी विविध उपक्रम राबवत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने बंद्यांना स्वयंरोजगार करता यावा, अशा पद्धतीच्या प्रशिक्षणावर भर दिला जातो. त्याचाच भाग म्हणून स्ट्रॉबेरी लागवड, कॉम्प्युटर बेसिक प्रशिक्षण, टेलरिंगचे प्रशिक्षण यापूर्वी देण्यात आले आहे.

सध्या कारागृहामध्ये असलेल्या बंद्यांपैकी बहुतांश हे युवक आहेत. त्यामुळे त्यांना रुची असेल, अशा फास्ट फूड व्यवसायाच्या प्रशिक्षणाची निवड श्री. शेडगे यांनी केली. त्यासाठी त्यांनी मुकुल माधव फाउंडेशन, येथील पुणे व मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी यांच्या माध्यमातून "फास्ट फूडचा" कोर्स सुरू करण्याचा निर्णय घेतला. या कोर्समधून बंद्यांना पाणीपुरी, रगडापुरी, कचोरी, वडापाव, मिसळपाव, समोसा, उपवासाचे पॅटीस, कांदा भजी, बटाटा भजी, गोबी मंच्युरियन, व्हेज मंच्युरियन, हक्का नूडल्स, फ्राइड राइस, व्हेज मोमोज, बर्गर, पास्ता, पिझ्झा असे विविध पदार्थ शिकवण्यात येत आहेत. समाजात असताना गुन्हे करून कारागृहात आलेल्या तरुण व युवकांना पुन्हा त्यांच्यात सुधारणा करून समाजात मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने हा कोर्स सुरू करण्यात आला आहे.

### पहिल्या दिवशी मिसळचे प्रशिक्षण

■ काल जिल्हा कारागृहामध्ये या कोर्सची सुरुवात झाली. या वेळी शामकांत शेडगे, मुकुल माधव फाउंडेशनचे सदस्य संतोष शेलार, मुंबई कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, सातारा यांचे प्रतिनिधी विनोद जाधव, कारागृहाचे वरिष्ठ तुरुंग अधिकारी ज्ञानेश्वर दुबे व बंदी उपस्थित होते. या वेळी बंद्यांना चटकदार मिसळ बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.